पऱ्यांना मूर्ख बनवणारी महिला



गुलाब इम्पे, चित्र : निक
मराठी : अश्विनी बर्वे

पऱ्यांना मूर्ख

बनवणारी महिला



गुलाब इम्पे, चित्र : निक


मराठी : अश्विनी बर्वे

अध्याय १

एक महिला होती जी पूर्ण जगात सगळ्यात चांगला केक तयार करत असे.

तिचे क्रिमरोल खूपच स्वादिष्ट होत असत. टोस्ट तर कमालीचे होते आणि बिस्किटे तर एकदम छान असत.

पण तिचे केक... जरा तुमचा श्वास रोखून धरा. ते खरेदी करण्यासाठी दूर-दुरून लोक येत असत.





पऱ्यांना सुद्धा त्या महिलेचे केक खूप आवडत असत.

पण पऱ्यांना रोज ते केक खरेदी करण्याची इच्छा नसे. पऱ्या त्या महिलेच्या खिडकीच्या खाली वाट बघत, ज्यात त्या केक उचलून पळून जाऊ शकतील. त्यांना वाटे की महिला आपले केक थंड होण्यासाठी खिडकीत तसेच सोडून देईल.पण महिला तसे करत नसे. ती महिला खूप समजदार होती.




मग पऱ्यानी आपापसात चर्चा केली की, ‘‘जर आपण तिचे केक चोरू शकत नाही, तर आपण केक बनवणाऱ्या महिलेलाच चोरून नेऊ.’’

अध्याय २

एका उन्हाळयाच्या रात्री महिला जंगलातून घरी जात होती. पहिले तिने छोटी छोटी कुजबुज ऐकली. मग तिला आपल्या चेहऱ्याच्या चारी बाजूला पऱ्याच्या पंखांची फडफड जाणवली.





लवकरच ती पुढे एकही पाऊल टाकू शकली नाही. तिला खूप थकल्यासारखे वाटत होते. मग तिने झोपून घेतले आणि तिने आपले डोळे बंद केले.

काही वेळानंतर पऱ्या कणकेची पिशवी घेवून परत आल्या. ‘‘तू आमच्यासाठी केक करशील का?’’ त्यांनी धापा टाकत विचारलं. “मी करेन, मी जरूर करेन,’’ महिला म्हणाली. ‘‘पण साखर कुठे आहे?’’

पऱ्यांना फार आश्चर्य वाटलं. त्यांच्याजवळ साखर नव्हती.

“आणि लोणी,’’महिला हसली, ‘‘दोन्ही वस्तू माझ्या स्वयंपाक घरात आहे.’’





परयांनी जोरात उड्डाण केलं आणि साखर आणि लोणी घेवून आल्या.

“आता तू आमच्यासाठी केक करशील?’’ त्यांनी जोरात विचारलं.

“मी करेन," महिला म्हणाली. ‘‘पण त्यासाठी मला अंडी हवीत.’’

पऱ्या आता रागावलेल्या दिसत होत्या.त्यांच्याजवळ अंडी नव्हती.

“माझ्या स्वयंपाक घरात एक डझन अंडी आहेत,’’ महिला त्यांना म्हणाली.



एक मिनटहून कमी वेळात पऱ्या अंडी घेवून आल्या.

पऱ्या आनंदाने अंडी हवेत उडवत होत्या.





"आता तू आमच्यासाठी केक करशील? पऱ्या ओरडल्या. यावेळी त्या पहिल्या पेक्षा जास्त खुश होत्या.

"मी करणार, मी करणार," महिला म्हणाली, "पण त्यासाठी मला एक मोठं भांडं पाहिजे."

"एक भांडं?" पऱ्या आपल्या छोट्या-छोट्या आवाजात ओरडल्या.

"माझ्या स्वयंपाकघरातल्या कपाटात एक मोठं भांडं आहे," महिला म्हणाली. "हो, आणि माझा लाकडाचा चमचा पण आण," ती पऱ्यांना म्हणाली.

महिलेचे मोठे भांडे दहा परयांनी मिळून उचलू शकल्या.

मग तीन परयांनी लाकडी चमचा उचलला.

"आता तुला आमच्यासाठी केक करावाच लागेल," पऱ्या महिलावर ओरडल्या.

पऱ्याचा स्वभाव असाच होता त्या खूप लवकर रुसत.

"मी करणार, मी करणार," महिला म्हणाली. "आता माझ्याजवळ ते सगळं काही आहे जे मला केकसाठी लागतं."

अध्याय ३

सगळ्यात आधी महिलेने लोणी आणि साखर एक साथ फेतली.

मग तिने अंडी पिठात मिसळली.



पऱ्या त्या महिलेकडे बघत राहिल्या.

त्यांची छोटी छोटी डोकी चमच्यांच्या गतीबरोबर फिरत होते.

मिश्रण मिसळत असतांना महिलेने डोकं हलवलं.

“मी बेकिंग टिन शिवाय केक कसा करू शकते?”

“कुठे आहे, कुठे आहे बेकिंग टिन?” पऱ्यानी विचारले आणि त्या ते आणण्यासाठी दाराबाहेर पळाल्या.

"बेकिंग टिन, सिंकच्या खालच्या कपाटात ..”

पऱ्या लवकरच परत आल्या, त्या बेकिंग टिनला तबल्यासारख्या पिटत होत्या.

त्या आवाजाने महिलेचे डोकं दुखू लागलं.”



तिने केकचे मिश्रण, बेकिंग टिन मध्ये टाकले.

मग तिने चारी बाजूला पाहिलं.





"मी हा केक कसा भाजू?" महिलेने विचारलं. " माझा बेकिंग टीन तुमच्या छोट्या भट्टीमध्ये मावणार नाही."

हे ऐकून पऱ्याना स्फुंदून स्फुंदून रडावं वाटलं.

"निःसंशय," महिला म्हणाली, "माझ्याजवळ घरी एक चांगला आणि मोठा ओव्हन आहे.."

महिला काही म्हणण्याच्या आधी, तिने स्वतः लाच हवेत उडतांना पाहिलं. आतापर्यंत सगळ्या पऱ्या त्या महिलेमुळे थकल्या होता. पऱ्या आता महिलेला उचलून तिच्या घरी घेवून जात होत्या.



तिथं महिला सुरक्षित आपल्या घरी उतरली. तिथं ती पऱ्यांना हसू लागली.तेव्हा पऱ्यांना कळलं की महिलेने त्यांना चांगलंच मूर्ख बनवलं. पऱ्या आता इतक्या उदास दिसू लागल्या होत्या, पण महिला त्यांना बघून खूप दुःखी झाली..

महिला म्हणाली की ती त्वरित केक भाजेन. पण पऱ्या आता खूप थकल्या होत्या. त्या आराम करण्यासाठी आपल्या घरी निघून गेल्या.

दुसऱ्या दिवशी, जेव्हा केक थंड झाला, तेव्हा महिला त्या पऱ्यांच्या महालात गेले.

तिने केक तिथं सोडून दिला कारण तिला माहित होतं पऱ्या तो नक्कीच शोधून खातील.

पऱ्याना जागं करणं ही खूप लाजिरवाणी गोष्ट होईल कारण त्यांची रात्र खूप व्यग्र होती.



कहाणीचा नकाशा



समाप्त